खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर

ता. खेड, जि. पुणे

## द्वितीय वर्ष कला (SYBA)

## मराठी (जी - २)

## सत्र चोथे

## मराठी साहित्य : भाषिक कौशल्यविकास आणि आधुनिक मराठी साहित्यप्रकार : ललितगद्य (CC-1 D(3)A)

SANJAY MAR HRM

## घटक २) 'साहित्यरंग' पाठ्यपुस्तक

## लेख ८) ह्या न्हैच्या पैलतडी... : प्रवीण दशरथ बांदेकर

डॉ. संजय शिंदे
उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख
हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर

ई - मेल : dr.sdshinde80@gmail.com भ्रमणध्वनी क्र. : 9604309060

## 'साहित्यारंग' पाठ्यपुस्तक

# लेख ८) ह्या न्हैच्या पैलतडी... : प्रवीण दशरथ बांदेकर

### लेखक परिचय :

**कवी, कादंबरीकार, संपादक आणि इंग्रजीचे अध्यापक.** 'येरु म्हणे', 'खेळखंडोबाच्या नावानं' हे कवितासंग्रह, 'घुंगरकाठी' आणि 'हरवलेल्या पावसाळ्यांचा शोध' हे ललित लेख, 'उजव्या सोंडेच्या बाहुल्या' ही कादंबरी आणि 'चिंटू चुळबुळे' आदी ग्रंथांचे लेखन त्यांनी केले आहे.

### या लेखाचा आशय :

**'ह्या न्हैच्या पैलतडी' हा प्रवीण दशरथ बांदेकर यांचा लेख आहे. नदी, गावाविषयीची आठवण या लेखात येते. नदीलाही व्यक्तिमत्व असते याची जाणीव लेखक या लेखातून करून देतात.**

लेखक एस.टी. बसमध्ये गावाकडे जात असताना तेरेखोलची खाडी लागते. **'पुस्तकातली नदी इकडे कशी'** या शेजारच्या चिमुकलीच्या प्रश्नाने लेखक अस्वस्थ होतात. मग नदीचा विचार करू लागतात.

**नदीने आपल्या दोन्ही काठांवर हजारो वर्षांपासून कित्येक पिढ्या, कित्येक गावे जगवली आहेत.** नदी गाववाल्यांच्या बऱ्या-वाईट दिवसांची, सुखदुःखांची साक्षीदार आहे. गोमांतक आणि महाराष्ट्राच्या सीमावर्ती भागात वाहणाऱ्या या नदीने गोवामुक्तीच्या ऐतिहासिक लढ्यात केवढी कामगिरी बजावली आहे. देशातील गंगा यमुना नर्मदा ब्रह्मपुत्रा अशा अनेक नद्यांनी देशाच्या सांस्कृतिक सामाजिक राजकीय इतिहासात त्यांचं अनन्यसाधारण स्थान अधोरेखित केले आहे. त्याचप्रमाणे या नदीनेही अनेकांचे जीवन वाहते ठेवले आहे.

लेखक सांगतात, **की कोकणातल्या या परिसरात शेकडो वर्षापासून आलेल्या माझ्या अनेक पिढ्या समुद्र आणि डोंगर पार करीत इथपर्यंत आल्या.** राजाची मर्जी सांभाळत दर्याची झुंजल्या. नदीकाठच्या भागात वास्तव्य करू लागल्या. आणि इथेच नदीकाठच्या डोंगरकुशीत विसावल्या.

**गावातून धावणाऱ्या नदीचा इतिहास, भूगोल जाणून घेण्याची कोणी उत्सुकता दाखवत नाही, याचे लेखकाला शल्य जाणवते.** लेखकाच्या गावाची भौगोलीक रचना विचित्र असल्याने गावात येण्यासाठी नदी

ओलांडावीच लागते. एखाद्या द्वीपासारखी तीन बाजूने नदी आणि पाठीशी डोंगर. गावात यायला नदीवर पूल नाही. रस्ता नाही. गावात कोणते वाहन नाही. त्यामुळे प्रदूषण नाही. आणि टीव्हीची भानगडही नाही. पावसाळ्यात पूर आला की सगळ्या दुनियेशी संपर्क तुटतो. आजच्या आधुनिक सुखसोयी पोहोचलेल्या काळातही शिकलेली पोर, **नव्या लेकीसुना नदीला नाक मुरडतात. या अशा मागास गावात कोणी येत नाही.**

गेल्या पाच दहा वर्षापासून मात्र नवी घरे नदीच्या अलीकडच्या काठावर उभी राहायला लागलीत. नोकरदार वर्ग वाढायला लागल्यावर शेती करणारे कुळवाडी हात कमी व्हायला लागलेत. तसं नदीचेही महत्त्व कमी व्हायला लागले आहे. **लेखक म्हणतो, मी ही याला फारसा अपवाद नाही. कॉलेजमधून संध्याकाळी वैतागून आणि दमून भागून घरी परतल्यावर वाडवडिलांनी लावलेल्या नदीकाठच्या नारळ-पोफळीच्या बागेतून नुसती नुसती एक चक्कर टाकली तरी दिवसभराचा सगळा शीण नाहिसा होतो, हे मी अनेकदा अनुभवलंय. नदीपाशी नसताना मात्र खळाखळ वाहणारं नदीचं पात्र, किनाऱ्यावरची मस्तीत डोलणारी माडाची, पोफळीची झाडं, केळीच्या बागा आठवत राहतात. कित्येकदा स्वप्नातही दिसत राहतात.**

मासेमारी करणारे तरुण, पुराच्या पाण्यात होडी लोटून नारळं, लाकडं धरणारे धाडसी तरुण, असफल प्रेम संपवायला नदीला जवळ करणारी भावकीतील नवथर तरुणी, नदीत होडी बुडून झालेल्या दुर्घटनेची पेपरला आलेली बातमी, पोहणं शिकायला आलेल्या शेजारच्या गावातल्या बुडत्या तरुणाला जिवावर उदार होऊन धडाधड उडी घेऊन वाचवणाऱ्या गाववाल्यांचे धाडस **अशा अनेक चांगल्या वाईट गोष्टींना ही नदी साक्षी आहे.**

**माणसांच्या आयुष्यासारखे नदीच्या नशिबी चढ-उतार असावेत का ? असा प्रश्न लेखक विचारतो. नदीचे वैभवाचे दिवस संपले, आता नुसताच खडखडाट ! कोणी सांगावं, तिसरा अंक वैभवाचा, सुखाचाही असू शकतो. तूर्तास मात्र हा वैशाखी मन:स्ताप सहन करणं भाग आहे !**

## या लेखाचे विशेष

'ह्या न्हैच्या पैलतडी' या लेखातून प्रवीण दशरथ बांदेकर यांनी नदीविषयीच्या आठवणींना उजाळा दिला आहे. नदीची आई होते, ती न्हय होते. या नदीची विविध रूपे आहेत. काळानुरूप तिच्यातील अवस्थांतरे, तिच्या भोवतीची माणसे, गावे, त्यांचा इतिहास, भूगोल, तिचे स्थान अशा कितीतरी पातळ्यांवरून नदीचा हा शोध आहे.

SANJAY MAR HRM

**कोकणचा समृद्ध निसर्गाचा, कष्टाळू - हटवादी माणसांचा हा आलेख सहजतेने गतकालीन वैभव, वर्तमानकाळातील दारिद्र्यासह आणि भविष्यातील वैभवाची 'आस' नोंदवितो. लेखकाच्या मनातील नदीचा आत्माविष्कार, लेखकाचे वाहत्या पाण्याविषयीचे आकर्षण, गाव, डोंगरदऱ्या, समृद्ध निसर्ग यांच्या वेगवेगळ्या कथा-व्यथांतून, आठवणींतून कोकणातील एक विलोभनीय आणि समृद्ध अनुभवाचा प्रत्यय येतो. नदीने शतकानुशतके केलेल्या प्रतिपाळाचा हा धांडोळा एका संपन्न अनुभवाचा प्रत्यय देणारा आहे.**

-------------------------------------------------------------------------------------------------------

**अध्यापन साहित्य निर्मिती :**
**डॉ. संजय शिंदे ,**
**हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर**

**संदर्भ ग्रंथ :**

१) **साहित्यरंग : डॉ. शिरीष लांडगे व इतर (संपादक)**

SANJAY MAR HRM